जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १२.०८.२०२६**

''वेश्या व्यवसायाकरीता स्वत:चे राहते घर उपलब्ध करून देणाऱ्या दोन महिला दलाल आरोपी व एक पुरुष दलाल आरोपी यांना गुन्हे शाखेकडुन अटक''

ठाणे शहराच्या **''घर नं. २३०, पाचपांडव कॉलनी, नॅशनल स्कुल जवळ, दुर्गा नगर, संभाजी चौक, उल्हासनगर-४ जि. ठाणे''** येथील स्वत:चे राहत्या घरात ०२ महिला दलाल व ०१ पुरुष दलाल असे तिघांनी आपसात संगणमत करून ०२ बळीत महिलांना प्राप्त करून, त्यांना पैशाचे आमिष दाखवून शरीर संबंधासाठी मागणी करणाऱ्या ग्राहकांकडून स्वत:चे फायदयासाठी पैसे स्विकारून ०२ बळीत महिलांना ग्राहकांसोबत शरीर संबंध प्रस्थापित करण्यासाठी बोलावून त्यांचेकडून वेश्याव्यवसाय करून घेण्याकरीता यातील महिला दलाल आरोपीने स्वत:चे राहते घर उपलब्ध करून देवून त्या मिळणाऱ्या उत्पनावर उपजिविका करून अपव्यापार करीत असल्याची गोपनिय माहिती मिळून आली.

त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर या शाखेने **दिनांक ११/०८/२०२६ रोजी १८.३५ वाजता ''घर नं. २३०, पाचपांडव कॉलनी, नॅशनल स्कुल जवळ, दुर्गा नगर, संभाजी चौक, उल्हासनगर-४ जि. ठाणे''** या ठिकाणी सापळा लावून दोन महिला दलाल आरोपी यांना व ०१ पुरुष दलाल आरोपी यांना १८:३५ वाजता ताब्यात घेवून त्यांचे तावडीतून ०२ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर दोन महिला दलाल आरोपी व एक पुरुष दलाल आरोपी यांचे विरुध्द **विठठ्लवाडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे दिनांक १२/०८/२०२६ रोजी ०४:५३ वा. गुन्हा रजि.नंबर ४२१/२०२६ भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १४३ (१), १४३ (३), ३(५) सह स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ३, ४ व ५ प्रमाणे** गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच ०२ पिडीत बळीत महिलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने सुधारगृहमध्ये ठेवण्यात आले आहे.

सदर कारवाई ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे तसेच श्री.मदन बल्लाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वपोनि/अंजली आंधळे, सपोनि/स्नेहल शिंदे पोउपनिरी/दिक्षा ढाकरे, सपोउपनिरी/व्हि.आर.पाटील, श्रेणीपोउपनि/ए.डी.क्षिरसागर, पो.हवा./७३९ डी.पी.महाले, पोहवा/३६६३ आर.यु.सुवारे, पो.हवा./१७४५ व्हि.जी.नाईक, मपोहवा./३६२९ ए.एस.मोरे, मपोहवा/७४२७ आर.के.भगत, मपोअमं/८१३१/पी.जी. खरात, मपोअं/२१७ एच.आर.थोरात, चापोअंम/५५३९ निकम यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे